# प्रेस नोट

## परीमंडळ २ पुणे शहर विभागातील मार्केटयार्ड पोलीस ठाण्याचे हद्दीतील सराईत गुन्हेगारास पुणे शहरातून व जिल्ह्यातून दोन वर्षासाठी हद्दपार केलेबाबत

दिनांक :- १४/१०/२०१७

मार्केटयार्ड पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सराईत गुन्हेगार इसम नामे महादु काळु पुटगे, वय २६ वर्षे, रा. स.नं. ५७० आंबेडकर नगर, मार्केटयार्ड, पुणे यास महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ५६ (१) (अ) (ब) प्रमाणे पोलीस उप आयुक्त परीमंडळ २, पुणे शहर यांचेकडील तडीपार आदेश क्रमांक ४१/२०१७ दिनांक १४/१०/२०१७ रोजी दोन वर्षाकरीता पुणे शहर व पुणे जिल्ह्यातून हद्दपार करण्यात आले आहे. सदर इसम खून करण्याचा प्रयत्न करणे, खंडणी, शिवीगाळ करुन धमकी देणे, जाळपोळ करणे, सामाईक इरादा वगैरे गंभीर गुन्हे करत आहे. त्याचे विरुध्द मार्केटयार्ड पोलीस ठाणे येथे वरील प्रमाणे गुन्हे दाखल असून त्याची सदर भागात दहशत असल्याने त्यास डॉ. प्रवीण मुंढे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ २, पुणे शहर यांनी पुणे शहर व पुणे जिल्ह्यातुन दोन वर्षा करीता तडीपार केले आहे.

नागरीकांना तडीपार इसम दिसून आल्यास नजीकच्या पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा.